**राज्यस्तरीय अँग्रोअँडव्हायजरी समितीच्या दि.२२/०४/२०१९ च्या बैठकीतील कृषि हवामान विषयक संदेश खालीलप्रमाणे आहे.**

**हवामानाचा अंदाज –**

१) कोकणामध्ये दिनांक २२ ते २५ एप्रिल २०१९ पर्यत हवामान कोरडे राहील. तसेच दिनांक २६ एप्रिल २०१९ रोजी तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.
२) पुढील ५ दिवस मध्य महाराष्ट्र , मराठवाडा, हवामान कोरडे राहील. विदर्भात दिनांक२२ एप्रिल २०१९ रोजी तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. व २३ ते २६ एप्रिल २०१९ पर्यत हवामान कोरडे राहील

**इशारा –**

१)विदर्भात दिनांक २२ एप्रिल २०१९ रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना,विजांचा कडकडाट, सोसाट्याच्या वाऱ्यासहपाऊसपडण्याचीशक्यता.
२) विदर्भात दिनांक २५ व २६ एप्रिल २०१९ रोजीउष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

**कृषि सल्ला -**

१) ऊस पिकावर खोडकिड दिसून आल्यास क्लोरॅन्ट्रनिलोप्रोल (Chlorantraniliprole) १८.५ % एस सी ३ ते ४ मिली प्रति १० लीटर पाण्यातून अथवा ०.४ % जी १८.७५ किलो प्रति हेक्टरी वापरावे.
२) भेंडीवरील रसशोषक किडी तसेच फळ पोखणारी अळी या किडीच्या नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रिन २.८ % ईसी ८ मिली क्विनॉलफॉस २५ % ईसी २० मिली किंवा लॅम्ब्डा सायहॅलोथ्रिन ५ % ईसी ६ मिली प्रति १० लीटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी.
३) आंब्यावरील फळमाशीच्या नियंत्रणासाठी मिथिल युजेनॉल युक्त रक्षक सापळे बागेमध्ये एकरी ८-१० याप्रमाणे लावावेत.
४) फळपिकांमध्ये पाण्याचे योग्य नियंत्रण करण्यासाठी शेतातील वेगवेगळ्या पिकांचे अवशेष (पालापाचोळा,गव्हाचा कोंडा, पाचट इ.) यांचे आच्छादन करावे.
५) मेंढ्या व शेंळ्यामध्ये बुळकांडी रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी या रोगाची लस टोचून घ्यावी.
६) कोंबडयांचे/पशुंचे उष्ण तेपासून संरक्षणासाठी शेड/ गोठ्याच्या बाजूने बारदान लावावे व ते पाण्याने भिजवावे. तसेच छतावर गवताचे किंवा बारदानाचे आछादन करावे.
७) जनावरांना चा-यांची कमतरता असल्यास गव्हाच्या काडावर तज्ञांच्या सल्लाने युरीयाची प्रक्रिया करुन जनावरांना खाऊ घालावे.

**टिप:-आपले झोन/जिल्हयानुसारचे संदेश आपले स्तरावरुन पाठविण्यात यावेत.**